# सत्य

**-- चं.प्र.देशपांडे**

चरणवीर -- एक तरुण, पराक्रमी दलपती. एका पायाने लंगडा. पडदा उघडतो तेव्हा याची राक्षस नामक भयानक कुत्र्याबरोबर मस्ती चालू आहे. प्रत्यक्ष कुत्रा न दाखवता त्याचे भुंकण्या--गुरगुरण्याचे आवाज आणि चरणवीरच्या वेगवान हालचाली यांतून ते प्रस्थापित व्हावे.

चरणवीरची आई एका आसनावर स्वस्थ बसलेली.

| | |
|---|---|
| आई : | ( काही क्षणांनी -- ) मला तर नक्की असं वाटतं की मला काही बोलताच येऊ नये म्हणूनच तुझा हा दंगा चालू असतो घरात -- त्या राक्षसाची एक साथ ! -- |
| चरणवीरः | राक्षस नाव उगीच नाही ठेवलेलं त्याचं ! -- आहेच तसा गुणाचा माझा हा मित्र -- आणि मी सैन्यातला एक नावाजलेला अधिकारी आहे -- मला व्यायाम नको ? |
| आई : | आणि व्यायाम नसेल तेव्हा आपल्याच विचारात गप्प बसून राहणं ! -- हेही लागतं का सैन्यात ? -- |
| चरणवीर : | ( पळत -- हसत -- कुत्र्याला पळवत -- उड्या मारायला लावत -- ) मग काय करू ? विचाराची सवय नको ? ( कुत्र्याला -- ) काय रे राक्षसा, सवय नको विचाराची ? नको ? राक्षस--राक्षस--राक्षस -- ( मोठ्यांदा हसतो -- ) |
| आई : | सून आण आता लौकर -- माझंही वय होत चाललं -- |
| चरणवीर : | ( हात वर करून कुत्र्याला उडी मारायला लावत -- ) सून ! ( पुन्हा -- ) सू ऽऽन !! -- |
| आई : | सून सून म्हणून त्या राक्षसाला काय उड्या मारायला लावतोस ? सगळी चेष्टाच वाटते तुला ! एवढा पराक्रमी तू ! युध्दात पाय कायमचा अधू झाला म्हणून स्वतः महाराज तुला चरणवीर म्हणाले आणि तुझं मूळचं विक्रम हे नाव मागं पडलं ! आणि तुझं घर हे असं असावं ? सुनं सुनं ? -- |
| चरणवीरः | अगं आई, तुझा मुलगा हा असा लंगडा -- कोण देणार तुला सून ? |
| आई : | खोटं बोलतोयस तू ! -- कुठल्याही मुलीला अभिमान वाटेल तुझी बायको व्हायला ! मी विचारू का कुठे सांग ! |
| चरणवीरः | ज्यांना इच्छा असेल त्यांनी विचारायची पध्दत आहे आई ! |
| आई : | मुलाकडून विचारायचीही आहे पध्दत ! |
| चरणवीरः | तु विचारायचं आणि त्यांनी दुसऱ्या कुठल्या तरी कारणांनी नाही म्हणायचं -- हे अनुभव घ्यायचेत का आपल्याला ? |
| आई : | म्हणजे कुणी विचारलं तर पुढे विचार करणार आहोत ना आपण ? |
| चरणवीरः | आई, नको हा विषय वाढवूस ! |
| आई : | आता थांब -- स्पष्टच विचारते -- माझ्या मनात अशी शंका आहे की तुला सेनापतींची मुलगी वासंती -- ती आहे तुझ्या मनात -- खरं असलं तर सांग -- मी विचारीन त्यांना -- |
| चरणवीरः | आई, इथं बोललीस तेवढं पुरे -- आणखी कुठं हे असलं बोलू नकोस -- सेनापतींची मुलगी म्हणजे काही साधीसुधी गोष्ट नाही -- |
| आई : | आणि तू तरी कुठे साधासुधा आहेस ? |
| चरणवीर : | विचार कर आई जरा -- तुझं तुलाही कळेल -- |
| आई : | म्हणजे माझी शंका बरोबर आहे -- |
| चरणवीरः | ( चिडून --) वेड्यासारखं बडबडू नकोस -- जाऊं दे ! -- ( पुन्हा कुत्र्याबरोबर पळापळ सुरू करत --)-- चल ! -- राक्षस -- राक्षस -- ( मस्ती वाढत जाते -- ) |
| आई : | कधीही विषय काढला तरी हेच !-- तुला माझा काही विचारच नाही -- मोकळेपणानं बोलणं नाही -काही नाही -- आपोआप घडेल ते घडेल -- आपण काहीच करायचं नाही ! -- असं झालंय सगळं --( उठून आत जात -- ) या गोष्टींची जाहीर चर्चा थोडीच करायची असते ! -- जाऊन विचारलं असतं मी -- |

( जाते. -- आतून -- ) मी सुध्दा थकत चाललेय आता -- मला नाही वाटणार की -- ( आवाज अस्पष्ट होत जातो. चरणवीरचे कुत्र्याशी खेळणे चालू राहते. ओरडा, पळापळ, कुत्र्याला उड्या मारायला लावणे आणि कुत्र्याचे भुंकणे, गुरगुरणे, इत्यादी. नंतर एकाएकी, समोरच्या खिडकीत एका तरुणाचा चेहरा येतो. घामाघूम आणि घाबरलेला.)

तरुण : चरणवीर -- चरणवीर -- मला लौकर आत घ्या -- मला वाचवा चरणवीर --नाहीतर ते मला ठार करून टाकतील -- चरणवीर -- ( चरणवीरचे लक्ष नाही. मस्ती चालू.) -- मी मुद्दाम तुमच्या घराच्या दिशेनं आलोय पळत -- चरणवीर -- ( ओरडतो -- ) चरणवी ऽऽ र ! ( चरणवीर थांबतो आणि पाहतो.)

चरणवीरः काय आहे ?

तरुण : आधी आत घ्या मला -- सांगतो -- ( क्षणभरानं चरणवीर त्याला आत घेऊन येतो. )

चरणवीरः ( तरुणावर भुंकणाऱ्या कुत्र्याला थांबवत -- ) नाही, नाही, राक्षस, शांत हो -- जा तिकडे -- ( कुत्र्याचे आवाज थांबतात.) -- हं -- काय गडबड आहे -- घाबरटपणा नकोय -- बोल --

तरुण : सेनापतींचे सेवक माझा पाठलाग करताहेत -- तुम्ही मला लपवलं नाहीत तर ते मला ठार करतील --

चरणवीरः तुला इथं समोर उभा ठेवूनही मी तुला वाचवू शकतो --

तरुण : पण --

चरणवीरः आणि तरीही -- सेनापतींचे सेवक म्हणजे तर आपलीच माणसं ! त्यांच्यापासून मी तुला का वाचवू ?

तरुण : तसं नव्हे चरणवीर -- मी निर्दोष आहे -- नंतर खात्री पटवून देईन मी तुमची -- पण आत्ता मला लपवा -- खरंच -- कृपा करा -- नंतरही तुम्ही माझं काय करायचं ते ठरवू शकता -- कृपा करा --

चरणवीरः ( क्षणभर त्याच्याकडे पाहून -- मग शांतपणे --) ठीक आहे -- लप या बाजूला -- ( तरुण तिकडे जातो. चरणवीर पुढे येऊन उभा राहतो. इतक्यात सेनापतींचे सेवक घाईघाईने खिडकीत येतात. चरणवीर वळून पाहतो.)

सेवक १ : प्रणाम दलपती ! --

चरणवीरः काय -- कसली धावपळ आहे --

सेवक १ : इथून एक तरुण पळत जाताना आपण पाहिलात का ? --

चरणवीरः नाही --

सेवक २: चला मग --

चरणवीरः थांबा -- काय प्रकार आहे ?

सेवक १: क्षमा करा दलपती --आम्हाला त्याचा पाठलाग करायला हवा --आम्ही नंतर येऊ -- ( जाऊ लागतात-- )

चरणवीरः थांबा तो इथंच आहे -- काय झालंय ?

सेवक २ : तो माणूस, सेनापतींची कन्या वासंतीदेवी यांच्या शयनगृहात शिरला आणि त्यानं त्यांच्यावर बलात्कार करायचा प्रयत्न केला -- त्या ओरडल्या -- आम्ही तिथे पोचतो तोवर तो पळत सुटला -- तेवढ्यात सेनापती तिथे आले -- ( हे ऐकताना चरणवीरच्या शिरा ताठर होत चाललेल्या -- ) काय घडलं हे कळताच त्यांनी त्या तरुणाचा पाठलाग करायची आणि सापडताच त्याचा ठार करायची आज्ञा केली --

चरणवीरः वासंतीदेवींचं ओरडणं तुम्ही स्वतः ऐकलंत ?

सेवक १, २: होय दलपती ! --

चरणवीरः हा प्रकार वासंतीदेवींनी स्वतः कथन केला ?

सेवक १: होय सदलपती --

चरणवीरः चल रे दुष्टा, बाहेर ये - ( तरुण घाबरत बाहेर येतो -- )

तरुण : खोटं आहे हे सगळं -- मी निर्दोष आहे -- मला संधी द्या -- मी सगळं सांगेन तुम्हाला -- ( चरणवीर संतापलेला. त्याची मानगूट धरतो. लाथाबुक्कया मारत त्याला बाहेर नेतो. तो ओरडत राहतो. मागोमाग सेवक १, २ जातात. अचानक त्या तरुणाची अंतिम किंचाळी ऐकू येते. काही क्षण ... मग अंधार... पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा चरणवीर आणि त्याची आई, सुन्न. आई सुस्कारते आणि आत जाते. चरणवीर स्वस्थ. काही क्षणांनी एक सेवक येतो.)

सेवक : प्रणाम दलपती ! आपल्याला भेटायला सेनापती आले आहेत -- ( मागोमाग सेनापती येतात.)

चरणवीरः प्रणाम ! -- झाला तो प्रकार फार वाईट झाला --

सेनापती : तुमचा आम्हाला अभिमान आहे. त्या वेड्याला शासन करण्यात तुम्ही गय केली नाहीत --

चरणवीरः संताप अनावर झाला सेनापती !

सेनापती : आम्ही समजू शकतो. तुम्हाला वृत्तान्त कळला, आज्ञा कळली आणि तुम्ही कृती केलीत ! वरिष्ठांबाबतची ही निष्ठा पाहून आम्ही धन्य झालो ! तुम्ही तुमचं कर्तव्य केलेलं असलंत तरी एका मुलीचा बाप म्हणून मी तुमचा आभारी आहे !

चरणवीरः छे, छे ! आभार कसले ! उलट आपल्यालाच इथवर येण्याचे श्रम पडले ! मी येणारच होतो आपल्याकडे !

सेनापती : ठीक आहे. तो विषय आता संपलेला आहे. तुमच्या योग्य कृतीचा ताबडतोब आदर करावा म्हणून आलो ! कर्तव्यच होतं ते आमचं ! तुमच्या विवेकशक्तीवरही प्रजाजनांचा खूप विश्वास आहे -- त्यामुळं योगायोगानं का असेना -- तुमच्या हातून त्याला शासन झालं हे विशेष महत्त्वाचं आहे !

चरणवीरः आपल्या उद्गारांबद्दल मी आभारी आहे !

सेनापतीः वासंतीला या धक्क्यातून सावरायला मदत करणं हे आमचं आता एक महत्त्वाचं काम आहे -- अनपेक्षितपणे घडू नये अशी घटना घडली ही तिच्या आयुष्यात --

चरणवीरः खरं आहे --

सेनापती : त्यात सध्या वाढत चाललेली ही युध्दाची शक्यता !

चरणवीरः त्याची काही काळजी नाही -- आपण सहज जिंकू --

सेनापती : असो. आम्ही चलतो.

चरणवीरः प्रणाम ! ( सेनापती जातात. मागोमाग सेवक जातो. चरणवीर स्तब्ध उभा. घाईघाईने एक तरुणी -- रूपमती -- येते. अत्यंत दुःखी -- रडून डोळे सुजलेली. जणू धीर एकवटून आलेली.) -- आपण ?

रूपमतीः मी रूपवती - विश्वनाथची बहीण. विश्वनाथ म्हणजे काही तासांपूर्वी आपण ज्याला ठार मारलंत तो !

चरणवीर : त्याचं कृत्यच तसं होतं, पण, आपल्या दुःखात मी सहभागी आहे ! माझा नाईलाज होता !

रूपमतीः आपण सेनापतीनिष्ठ ! सत्याचे सेवक । कठोर कर्तव्यतत्पर अधिकारी !

चरणवीरः आपण आपल्या भावाला मुकला आहात त्याची प्रतिक्रिया मी समजू शकतो -- परंतु आपणही एक स्त्री आहात. क्षणभर भावाचं प्रेम बाजूला ठेवून या प्रकाराकडे पाहा.

रूपमतीः स्त्रीच्या शीलाचं रक्षण करण्यात पुरुषी अहंकार समाधान पावणं यात वाईट काय आहे म्हणा !

चरणवीरः आपल्या बोलण्याला कडवटपणाचा वास आहे --

रूपवतीः मुळातच लोकांना आपल्याबद्दल खूप आदर होता -- तो आता आणखी वाढला आहे --

चरणवीरः म्हणणं काय आहे आपलं ?

रूपमतीः त्या आदर बाळगणाऱ्या लोकांत मी नाही ! मी विश्वनाथची बहीण आहे म्हणून नव्हे तर तो निरपराध असल्याचं मला माहीत आहे म्हणून !

चरणवीरः निरपराध ? भावाच्या प्रेमानं आपण आंधळ्या झालेल्या दिसता --

रूपमती : तसं नसून, सेनापतीनिष्ठेनं आपण स्वतः आंधळे झालेले आहात --

चरणवीरः आपण -- म्हणजे --

रूपमतीः आता काहीच उपयोग नाही -- पण सत्य सांगायचं आहे - पटलं तर एक मागणीही आहे --

चरणवीरः सत्य ? कोणतं सत्य ? वासंतीदेवींच्या शयनगृहात आपल्या भावानं प्रवेश मिळवला. नंतर त्यानं जबरदस्तीचा प्रयत्न केला. त्यामुळं वासंतीदेवी ओरडल्या. बरीच धावाधाव झाली. आपला भाऊ तिथून पळून जाऊ लागला. -- हे सत्य नाही ?

रूपमतीः मला हे बनावट सत्य वाटतं. हे सगळं घडलं असेल तर कसं घडलं ते मला सांगता येणार नाही. पण वासंतीदेवींचं माझ्या भावावर प्रेम होतं. त्या दोघांच्या मधूनमधून भेटीगाठी होत होत्या -- हेही एक सत्यच आहे. तो त्यांच्या महालाबाहेरचा एक रक्षक शिपाई होता.

चरणवीरः हे सगळं आपल्या भावानं जर आपल्याला सांगितलं असेल तर मला वाटतं तो थोडा वेडाही असावा. वासंतीदेवी कुठं, तो कुठं !

रूपमतीः जाताना शेवटी तो मला काय म्हणाला होता ते सांगते. ( विश्वनाथ येतो. त्याच्यावर प्रकाश.)

विश्वनाथः मी नकळतच या चक्रात गुरफटून गेलोय. वासंतीचं मला आकर्षण वाटतं हे खरंच आहे पण त्याच वेळी हेही कळत असतं की हे धोक्याचं आहे. आपण पायरी सोडतोय. पण तिलाही माझ्याबद्दल आकर्षण वाटल्यामुळं हे सगळं वाढत गेलं. जातायेता नजरानजर न चुकता व्हायला लागली. दोनदा तर तिनं मला तिच्या महालात बोलावून घेतलं. आलिंगन, चुंबन इथपर्यंत मजल गेली. याचबरोबर माझ्या मनात अपराधी भावना वाढत

चालली. पण आता माघार शक्य नव्हती. तिला मी हवा होतो. कशी धेणार माघार ? हे प्रेम आहे का ? समजा हे सगळं उघडं झालं तर ती कशी वागेल ? की तिची ती सुरक्षित राहील ? शिवाय, माझी व्यक्तिगत भावना माझ्या कर्तव्यावर मात करतेय याचाही ताण ! आता तर बहुतेक माझ्यावर पाळत ठेवली जातेय अशी मला शंका आहे. यातून काहीतरी वाईट घडेल असं वाटतंय. पण करणार काय ? तिला बघितलं की अजूनही मी बेभान होतो ! ( प्रकाश जातो... विश्वनाथ जातो... )

चरणवीरः असं जर खरोखर असतं तर वासंतीदेवी ओरडल्या नसल्या. जबरदस्तीचा प्रयत्न झाल्याचं बोलल्या नसत्या.

रूपमतीः असं असतं तर असं झालं असतं आणि तसं असतं तर असं झालं नसतं !

चरणवीरः मला माझ्या समजुतीवरच विसंबणं भाग आहे !

रूपमतीः आपण माझ्या भावाची निष्कारण हत्या केलेली आहे ! -- माझ्या निरपराध भावाची ! आपल्या आंधळ्या निष्ठेमुळं आणि चुकीच्या समजुतीमुळं !

चरणवीरः ( विचारात -- ) तो पळून आला होता -- लपवून ठेवा म्हणत होता -- ( क्षणभरानं -- ) काही पुरावा ?

रूपमती : माझा भाऊ माझ्याशी काय बोलला ते मी आपल्याला सांगितलं ! तोच पुरावा !

चरणवीरः आणखी कुणाला सांगितलंय हे सगळं ?

रूपमतीः स्वार्थी, सत्तांध माणसांना, भोळसटपणे टक्कर देण्यात अर्थ नसतो एवढं मला समजतं. आपल्याला मी एक वेगळी व्यक्ती समजते. माझ्या भावाचे आणि वासंतीदेवींचे संबंध माहीत असलेली माणसं नाहीत असं नाही. पण आज सगळे गप्प आहेत -- अशा लोकांत बोलून तरी काय उपयोग ?

चरणवीरः हं. ( क्षणभरानं -- ) आपला काय अंदाज ?

रूपमतीः माझ्या अंदाजानं मला जे वाटतं ते सांगते. कदाचित खरं असेल -- कदाचित खोटं असेल. माझा भाऊ एक साधा शिपाई होता. वासंतीदेवी म्हणजे सेनापतींची कन्या ! मनाचे खेळ झाल्यावर, प्रकरण वाढू नये, आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागू नये म्हणून वासंतीदेवींनीच रचलेलं हे एक नाटक आहे. विश्वनाथलाही बिचाऱ्याला काय घडतं आहे -- काहीच कळलं नसेल. पण ज्या माहितीवर आपण आपली समजूत आधारलीत ती माहिती अर्धसत्य किंवा कदाचित असत्यच होती. माझ्या निरपराध भावाची आपण नरपशू म्हणून हत्या केलीत -- ( डोळे भरून येतात.)

चरणवीर मी --

रूपमतीः माझ्या भावाची छीःथू होतेय सगळीकडे --

चरणवीरः मी सत्य समजून घेईन --

रूपमतीः अवश्य घ्या -- घ्याच -- आणि आपल्याला जर आपली चूक उमगली तर -- आणि माझ्या दुःखाचीही आपल्या लेखी काही किंमत असली तर -- तर मात्र एक मागणी आहे -- आपल्याला फसवणाऱ्यांचा आपण योग्य तो सूड घेतला पाहिजे -- तरच -- आपल्याला आपल्या कृत्याचा खरोखरच पश्चाताप झाला असं मी समजेन !

चरणवीरः मला योग्य वाटणारी कृती मी करेन --

रूपमतीः मी कितीही वाट पाहीन -- माझा आपल्यावर विश्वास आहे -- आपल्या हातून जर याचा सूड घेतला गेला तर निदान, माझ्या भावाला मारणाऱ्याच्या लेखी तरी तो नरपशू राहिला नाही याचं मला समाधान मिळेल -- येते -- ( ती जाते. चरणवीर विचारात ... अंधार होत जातो... पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा चरणवीर बसलेला. त्याच्या अवतीभवती फिरत राक्षस गुरगुरतोय. आई भाजी निवडत बसलेली... )

आई : ( काही क्षणांनी -- ) आज तिसरा दिवस -- राक्षसाबरोबर व्यायाम नाही वाटतं करायचा ? ( चरणवीर गप्प ... ) युध्द होणार का ? ( तो गप्पच ... ) नाही झालं तर बरं होईल ... एका युध्दाचा फटका खाऊन बसलोय आपण... चरणवीर या नावाच्या बदल्यात ... खर तर कधीच, कुणाचंच, कुणाशीही होऊ नये युध्द ... शांततेनं का जगता येऊ नये ... अं ... का येऊ नये ...

चरणवीरः हजारो वर्षं हेच चाललेलं आहे... शौर्य हे लागणारच ...कचखाऊ विचार नकोत ...

आई : ( काही क्षणांनी -- ) ... कळतंय का काही ? खरं काय असेल ते ?

चरणवीरः आई, आणि हे सगळं इथल्या इथंच हं -- आपल्या तोंडून कुठं काही नको ...

आई : म्हणजे माझ्या तोंडून ! ... घडलंय असं काही कधी ? ... आणि ती रूपमती तरी एवढा वेळ काय बोलत होती ते सगळं कुठं मला माहिती आहे ? नुसतं वरवरचं सगळं !

चरणवीरः तुला तेवढं पुरेसं आहे --

आई : मी उत्सुकता मारूनच टाकते खूपवेळी -- पण -- ( एक सेवक येतो.)

सेवक : ( चरणवीरला -- ) वासंतीदेवी आपल्याला भेटायला आल्या आहेत --

चरणवीरः या, या म्हणावं -- ( सेवक जातो. ) आई, तू आत जा --

आई : मी तिला बघून मगच जाईन आत आता -- ( वासंती येते.) ये बाई ! खूप छान वाटलं ! बस ! ( ती आईच्या पाया पडते आणि मग बसते.) छान वाटलं... आलेच ... ( असं म्हणत आई आत जाते. )

वासंती : विचारांनी मस्तक फुटायची वेळ आली ! मी आपले आभार मानण्यासाठी आलेय इथे--असं सांगितलंय !--

चरणवीरः मी माझं कर्तव्य केलेलं आहे ! --

वासंतीः मनातले विचार जिथं बोलता येतील असे आपणच फक्त आहात --

चरणवीर : बोला --

वासंती : घडल्या त्या गोष्टी कशा घडल्या ते आपल्याला सांगायची इच्छा आहे --

चरणवीरः ते आता सर्वांना माहीत आहे --

वासंती : सर्वांना माहीत आहे ते सत्य नाही. विश्वनाथचा मृत्यू घडायला मी कारण आहे. माझा भित्रेपणा --

चरणवीरः भित्रेपणा ?

वासंती : होय. हे सगळं अनपेक्षितपणे घडवलं गेलेलं एक नाटक आहे. माझ्या तातांनी -- सेनापतींनी घडवलेलं --

चरणवीरः पण तो तर -- त्यानं तर --

वासंती : तो माझ्या शयनगृहात आला होता हे खरं आहे. पण त्यात त्याची काहीच चूक नव्हती. आमचं एकमेकांवर प्रेम होतं.

चरणवीरः ( आश्चर्याने -- ) मग --

वासंती : तुमचे सगळे प्रश्न मला माहीत आहेत. मग हा जबरदस्तीचा प्रयत्न असल्याचं कसं पसरलं ? मी ओरडले का ? त्याला ठार करण्यासाठी सेवक त्याचा पाठलाग करत गेले तरी मी गप्प कशी राहिले ? आणि आता तुमच्याकडे कशासाठी आले आहे ? --

( इथे प्रकाश बदलतो. वासंतीचे शयनगृह. वासंती आणि विश्वनाथ हळू आवाजात काहीतरी बोलताहेत. हसताहेत. एवढ्यात दारावर बाहेरून धाड-धाड आवाज. ' दार उघडा -- दार उघडा -- लौकर -- ' -- असे दरडावणीचे आवाज. दोघांचाही गोंधळ उडतो. थोडी पळापळ. कुठे लपावं हे कळत नाही. विश्वनाथ खिडकीतून पळण्यासाठी जातो पण ' पहारेकरी आहेत -- ' असे म्हणत मागे येतो. आता लपणे किंवा पळणे शक्य नाही हे लक्षात येऊन तो उभा राहतो. क्षणभर पाहून वासंती जाऊन दार उघडते. सेवक १ आणि २ आत येतात.)

सेवक १: हा बघ --

सेवक २: पकड शिंदळीच्याला -- ( ते त्याला पकडतात. सेनापती येतात. संतप्त चेहरा पण बोलणे नेहमीच्या आवाजात.)

वासंती : हे काय चाललंय ? काय चाललंय हे ?

सेनापतीः हे काय चाललं आहे ते तुला सांगायलाच मी आलो आहे. गोंधळू नकोस. शांत राहा. आत्ता या विश्वनाथनं तुझ्यावर बलात्काराचा प्रयत्न केलेला आहे. तुझा आरडाओरडा ऐकून हे सेवक इकडे धावत आले. तो खिडकीकडे गेला -- तेवढ्यात तू दार उघडलंस. एवढ्यात मीही इथं आलो. मला एकूण वृत्तान्त लक्षात येताच मी या सेवकांना त्याचा पाठलाग करायची आणि तो सापडताच त्याला ठार करायचीही आज्ञा दिली आहे.

विश्वनाथ : पण --

वासंती : माझं प्रेम आहे त्याच्यावर --

सेनापती : गप्प बस -- उलटंपालटं वागलीस तर तुझ्याबद्दलही आज्ञा द्यावी लागेल -- असं कस चालेल ? -- महाराजांच्या, प्रजाजनांच्या माझ्याबद्दल काय कल्पना आहेत, अपेक्षा आहेत -- हे विसरता येईल ?
( सेवकांना -- ) सोडा त्याला -- ( ते सोडतात.) -- काही क्षणांनी त्याचा पाठलाग सुरू करा --
( विश्वनाथजवळ येऊन -- ) तुझा जीव वाचवायची संधी तुला दिलेली आहे -- या राज्यात तू सापडलास तर तुला ठार केलं जाईल -- तू या खिडकीतून पळून जाऊ शकतोस -- ( वासंतीही संतप्त पण भावनातिरेक दाबत उभी. विश्वनाथ, वासंतीकडे आणि सेनापतींकडे दृष्टिक्षेप टाकून खिडकीतून पळून

जातो.)

वासंती : ( ओरडते -- ) खोटं खोटं खोटं -- का हे सगळं --

सेनापतीः ( वासंतीला--) ओरडू नकोस--( सेवकांना -- ) कळलं सगळं ? काय घडलंय आणि काय करायचंय ? --

सेवक १, २: होय सेनापती --

सेनापतीः चला मग -- ( सेवक १, २ जातात. ) मी सांगतोय असंच हे सगळं घडलं असं तूही म्हणण्यातच सगळ्यांचं हित आहे. एका मान्यवर सेनापतीची कन्या आहेस तू ! एका सामान्य सैनिकाशी तुझा संबंध येऊ शकत नाही ! सगळी घडीच विस्कटून जाईल ! -- मी केवढ्या मोठ्या प्रमाणावर काय घडवू पाहतोय ! -- आणि हा असला क्षुद्र अडथळा ! शक्य नाही ! ( काही क्षणांनी -- ) मला हे माहीत झालं होतं -- सूचकपणे मी तुला काही बोललोही होतो -- शेवटी नाईलाज होऊन पाळत ठेवावी लागली -- ( क्षणभरानं -- ) आपल्या सर्वांच्या चांगल्यासाठीच हे करतोय --

वासंतीः ( भावनातिरेकानं -- ) मी -- मी --

सेनापती : तुझं दुःख मान्य ! मोठ्यांना मोठीच दुःखं पेलावी लागतात. खुळचट धाडसीपणा करू नकोस. खरंखोटं करत बसलीस तर खूपच गोष्टींची नासाडी होईल. तुझ्या शहाणपणावर माझा विश्वास आहे -- माझ्या शहाणपणावर तू ठेव... सगळ्या शंका नष्ट होण्यासाठी हे असंच आवश्यक होतं -- नाहीतर बाहेर कुठेही कुठल्याही कारणानं नसतं मारता आलं त्याला ? आता त्याच्याबद्दल सगळ्यांना घृणाही वाटेल ...( दोन क्षण थांबतात आणि झटकन जातात. वासंती भावनातिरेकाचा हुंदका दाबत उभी... प्रकाश जाऊन पुन्हा येतो तेव्हा पुन्हा वर्तमान... चरणवीर चकित आणि दिङमूढ उभा.)

वासंती : बहुतेक मी मरणाला घाबरले ! त्यावेळी माझे तात -- सेनापती वेगळेच दिसत होते ! मी काहीच करू शकले नाही ! मृत्यू पत्करणं याखेरीज काही करणं शक्यही नव्हतं ! त्यांनी सांगितलेल्या शहाणपणानं वागणं मला भागच होतं ! पण माझ्यामुळं त्या बिचाऱ्याचा मृत्यू झाला ही गोष्ट सतत मला छळत राहील ! मीही तितकीच दोषी होते ! निरनिराळ्या विचारांनी माझ्या डोक्याचं नुसतं रणमैदान होऊन गेलं आहे ! तो ठार तर झालाच पण तो तुमच्या हातून ठार झाल्यानं तो ठार झाला हेच बरोबर झालं असं सगळ्यांना वाटणार आहे !

चरणवीरः म्हणजे मी त्याला ठार मारलं हा माझा एक गुन्हा आणि इतक्या वर्षात मी सगळ्यांचा विश्वास संपादन केलाय हा दुसरा गुन्हा !

वासंती : नाही नाही. तसं नव्हतं म्हणायचं मला. आपल्याला मी काहीच दोष देऊ इच्छित नाही. माझ्या तातांनी एवढा मोठा धूर्त डाव टाकला -- उघडपणे -- तरी त्यांनाही दोष देणं तसं कठीणच आहे. कारण त्यांच्या बाजूनंही प्रचंड समर्थन आहे.

चरणवीरः समर्थनं असतातच !

वासंती : माझं प्रेमही खोटं नव्हतं ! -- हेही माझ्या जगण्यात कुठंतरी आणणं मला आवश्यक वाटतं ! माझ्या प्राणसख्याची हत्या घडवताना त्यांना जसं निर्दय व्हावं लागलं -- स्वतःच्या भूमिकेत ठाम राहावं लागलं --तसंच, मलाही, त्याच कठोरपणानं -- माझ्या भूमिकेतून याचा सूड घेतला जायला हवाय --

चरणवीरः म्हणजे आपण सेनापतींना --

वासंती : मी नाही -- मला आपली मदत हवीय -- आपल्या मनात माझ्याबद्दल कोणतीही चांगली भावना असेल आणि माझी या घटनेबद्दलची प्रतिक्रिया आपण समजु शकत असाल तर --

चरणवीरः म्हणजे ?

वासंती : म्हणजे आपण याचा सूड घेतला पाहिजे. याचा सूड घेतला गेला आहे हे फक्त मला एकटीलाच कळलं तरी पुरे. किंबहुना ते तसंच व्हावं --

चरणवीरः पण हा सूड मी कशासाठी घ्यायचा ?

वासंतीः आपली फसवणूक झाल्याबद्दल ! आपल्याकडे विश्वासानं आलेल्या एका निरपराध प्रियकराची आपल्याकडून हत्या घडवली गेल्याबद्दल ! त्यामुळं एक प्रेयसी कायमची दुःखी झाल्याबद्दल ! अशी घटना घडवणाऱ्या नीच स्वार्थीपणाला शासन व्हायला हवं म्हणूनही ! एका काल्पनिक गुन्ह्याचं शासन म्हणून आपण विश्वनाथला ठार केलंत -- मग या खऱ्या गुन्ह्याच्या शासनाचं काय ? ( काही क्षणांनी -- ) करू ना मी आपल्याकडून अशा मदतीची अपेक्षा ?

चरणवीरः माझ्या डोक्यात सगळाच गोंधळ माजला आहे. मला विचार करावा लागेल.

वासंती : मी कितीही वाट पाहू शकेन.

चरणवीरः एखादी कृती करण्या न करण्याचे अर्थच हरवल्यासारखं झालं आहे.

वासंती : आपले विचार लौकरच स्थिरावतील अशी मी आशा करते. ( क्षणभरानं -- ) जाऊ ? ( चरणवीर काहीच बोलत नाही. ती जाते. क्षणभरानं -- जणू स्वतःशीच -- ) त्याला ठार करण्याच्या माझ्या कृतीत निष्ठा, कर्तव्य यांबरोबरच माझ्या मनात असणाऱ्या वासंतीबद्दलच्या आकर्षणामुळं निर्माण झालेला संतापही असेल का ? थोडा का असेना ? आणि आता हे कुणालाच कळणार नाही. एवढा जर मी विवेकी, न्यायी असेन तर या माझ्या गुन्ह्याचं शासन काय ? की स्वतःशिवाय दुसऱ्या कुणालाच माहीत नसलेले आपले गुन्हे क्षम्य असतात ? की गुन्ह्याच्या अपराधी जाणीवेचा त्रास हेच त्याचं शासन असतं ? ( हळूहळू प्रकाश मंद होत जातो तसतसे युध्दाचे आवाज सुरू होतात. घोड्यांच्या टापा, तलवारींचे खणखणाट, आरोळ्या आणि रणमैदानावरचा कल्लोळ. काही क्षण असेच. नंतर हळूहळू पुन्हा शांतता. आता काही क्षण कुत्र्याच्या रडण्याचा आवाज. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा चरणवीरची आई शोकाकूल बसलेली. जवळ रूपमतीही बसलेली. दोन क्षणानंतर -- )

रूपमतीः विजय मिळाला पण हे असं घडलं...फार दुःख झालं...

आई : देवाचे खेळ म्हणायचे... लग्नही व्हायच्या आधीच ...

रूपमती : कुठेही विजयाचा आनंद नाही... सेनापती आणि चरणवीर दोघंही गेल्यामुळं सगळे दुःखी आहेत...

आई : राज्यात काय काय बोलतायत म्हणे लोक ...

रूपमतीः हो... मीही ऐकलंय ते... कुणी म्हणतंय, सेनापती शत्रूसैनिकाची तलवार लागून पडत होते, तिकडे चरणवीरांचं लक्ष गेलं आणि ते तिकडे जात असताना त्यांच्यावर वार झाले... कुणी म्हणतंय, चरणवीरांचीच तलवार अपघातानं सेनापतींना लागली आणि चरणवीर तिकडे पाहात असताना एका शत्रूसैनिकानं त्यांच्यावरही वार केले... कुणी म्हणतंय, चरणवीरांनी सेनापतींवर ठरवून वार केला...

आई : असं कसं होईल !... सेनापतींबद्दल त्याला खूप आदर होता... आणि मुख्य म्हणजे प्रखर निष्ठावान होता माझा बाळ ... ( डोळे पाणावतात.)

स्पमती : तुम्ही नका वाईट वाटून घेऊ ... त्यांच्या निष्ठेबद्दल कुणीही काहीही बोल लावू शकणार नाही... ( क्षणभरानं -- ) अगदी आपला विजय निश्चित झालेला असताना हे असं घडलं म्हणतात... हे असं घडलं नसतं तर केवढा मोठा उत्सव झाला असता या विजयाचा ...

आई : तुझ्या भावाची त्याच्या हातून हत्या झाली होती... तरीही तू आलीस... मोठ्या मनाची आहेस तू...

रूपमती : त्याचा मी चरणवीरना दोष देत नाही... ( क्षणभरानं -- थोड्या वेगळ्याच प्रकारे -- ) युध्दावर जाण्यापूर्वी ते तुमच्याशी काही बोलले होते ?

आई : नेहमीप्रमाणे -- ' जिंकून येईन ' -- इतकंच म्हणाला होता --

रूपमती : म्हणजे पुन्हा भेट होईल न होईल -- असं काहीच नव्हतं वागण्यात...

आई : नाही बाई ...

रूपमतीः किंवा ते वेगळ्याच काही विचारात आहेत असं काही तुम्हाला वाटलं होतं ?

आई : नाही... असं का विचारतेस ...

रूपमती : नाही म्हणजे मृत्यूची चाहूलबिहूल बोलण्यात व्यक्त झाली होती का ते विचारत होते...तुमच्यावर मात्र दुःखाची कुऱ्हाडच कोसळली...

आई : देवाचे खेळ म्हणायचे...

रूपमतीः ते खूप विवेकी आणि न्यायी होते... नेहमीप्रमाणेच जिंकायला म्हणून गेले आणि ... माझ्यासाठी एक महापराक्रमी योध्दा कामी आला...

आई : तुझ्यासाठी... ?

रूपमतीः म्हणजे सगळ्यांसाठीच की ! राज्यातल्या प्रत्येकासाठी ! प्रत्येकजण त्यांच्या मृत्यूनं दुःखात आहे ! खरंच ते खूप मोठे होते ! ( क्षणभरानं -- ) एका मोठ्या पराक्रमी योध्याची आई आहात तुम्ही... धीराच्या आहातच ...पण जपा...

आई : हं...

रूपमती : बरं, येते मी ... ( उठते -- )

आई : हं ... ( रूपमती जाते. ती जात असतानाच वासंती येते. वासंतीला पाहताच रूपमती ताठरते. दातओठ

खाऊन तोंडातल्या तोंडात ' नी ऽऽ च ' असं म्हणते -- वासंतीची मान खाली -- रूपमती झटक्यात निघून जाते. तिनं उच्चारलेला ' नीच ' हा शब्द वासंतीच्या डोक्यात घणघणतो. आईपुढे येते. हमसत हमसत बसते. तिच्यामुळे आईलाही रडू येते. काही क्षणांनी -- )

वासंतीः त्यांचा लाडका कुत्रा ... गप्प बसून आहे... डोळ्यांत आसवं आहेत त्याच्या ... मुक्या प्राण्यालाही ... किती दुःख ...

आई : अन्नपाणी वर्ज्य केलंयन त्यानं -- समोर काही ठेवलं तर पाहातही नाही ... ( क्षणभरानं -- ) तुझेही तात गेलेले असून तू आलीस ...

वासंती : तुमच्यासाठी ...

आई : त्यात हे अफवांचं एक पीक उठलंय ...

वासंती : माहिती आहे मला ते ... माझ्या महालातली एक दासी तर म्हणत होती की म्हणे विजय निश्चित झाल्यावर चरणवीरांनी सेनापतींवर वार केला आणि ते पाहताच आपल्याच सैनिकांनी चरणवीरांवर वार केले ! ए ऽ क कानशिलातच दिली मी तिला... काहीही बोलतात... असं कस होईल ... ( क्षणभरानं ---) युध्दावर जाण्यापूर्वी काही बोलले होते ते ?

आई : नेहमीप्रमाणे ' जिंकून येईन ' इतकंच --

वासंती : म्हणजे मृत्यूची चाहूलबिहूल वाटावी असलं काहीच नव्हतं ... ?

आई : असलं काहीच नव्हतं गं... नंतर आपण उगीचच विचार करत बसतो...

वासंती : एखाद्या खऱ्या गोष्टीसाठी प्राणही देणारे महान पुरुष होते ते ...

आई : लग्न राहिलं गं पण ... सून असती... नातवंडं असती... तर बरं झालं असतं...

वासंती : धीरानं घ्या आता ...

आई : आणि त्याचा मृत्यूही डागाळला जातोय... काहीही बोलतायत लोक... किती वाईट आहे हे...

वासंती : तुम्हाला वेगळं वाटेल असं काहीच नव्हते बोलले ?

आई : नाही गं बाई ... असं काहीच नाही...

वासंती : माझ्यासाठी एक महापराक्रमी योध्दा कामी आला !-- म्हणजे असंच वाटतंय राज्यात प्रत्येकाला ! प्रत्येकासाठीच की ! ... ( क्षणभरानं -- ) येऊ मी ? ...

आई : हं ... ये ... तूही सांभाळून ... रहा.

वासंती : हं ... ( उठते आणि जाते. तेवढ्यात बाहेर दवंडीचा आवाज येतो... आई चेहऱ्यावरचे भाव न बदलता बसून ... जणू थकल्याप्रमाणे ... दवंडी अशी -- )

दवंडी : ऐका हो ऐका... नुकत्याच संपलेल्या युध्दात आपला विजय झालेला असून इतर काही पराक्रमी योध्यांबरोबरच आपले सेनापती आणि चरणवीर हेही या युध्दात कामी आलेले आहेत. त्यांचे मृत्यू दैदीप्यमान असून राज्याला त्यांचा अभिमान वाटतो. याबाबतीत जनतेत काही अफवा उठलेल्या दिसत असून याची गभीर दखल घेण्यात येत आहे. या दोघांचे मृत्यू युध्दात लढता लढताच झालेले असून याबाबतीत कुणीही काही अफवा पसरवताना आढळल्यास त्याला योग्य ते शासन करण्यात येईल. राज्याला नेहमीच आदरणीय राहिलेल्या या दोन पराक्रमी राजनिष्ठांच्या मृत्यूबाबत कोणत्याही प्रकारचे वाईट बोलणे खपवून घेतले जाणार नाही हो ऽ ऽ ... ( आई समाधानाचे अश्रू पुसत असताना प्रकाश मंद होत जातो. पुन्हा -- ) ... ऐका हो ऐका ...

-- पडदा पडत जातो --

सूचना -- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा. चिंतामणीनगर,
सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे - ४११००९
दूरध्वनी -- ४२२७८४७